साप्ताहिक

# नगारा

संस्थापक संपादक : दलितमित्र स्व. गोविंदराव गोरवाडकर

R.N.I. No. 16746/67 पोष्टाचा परवाना क्र. एम.जी.एन.३९/२०१८-२०२०

ISSN 2278-3954 Saptahik Nagara


श्री. ______

पत्ता ______

______

वरील पत्त्यावर अंक न पोहोचल्यास परत पाठविण्याचा पत्ता : मा. संपादक सा. नगारा, ८५२, गोरवाडकर वाडा, मालेगांव कँम्प (नाशिक)


NAGARA WEEKLY

* मंगळवार दि. १६ जुलै २०१९




संस्थापक संपादक
**दलितमित्र**
**स्व.गोविंदराव गोरवाडकर**
मुख्य मानद संपादक
**डॉ. विनोद गोरवाडकर**
संपादक
**सौ. सोनाली विनोद गोरवाडकर**
कार्यकारी संपादक
**मुरलीधर जोशी**

◆

**दूरध्वनी:०२५५४-२५२८७३**
**भ्रमणभाष:- ९४२३४७७२७३**
**९४२१३७३८७३**

◆

**वर्ष ५२ वे**
**अंक ४६**

◆

**दि. १६ जुलै २०१९**
**ते दि. २३ जुलै २०१९**

◆

**किरकोळ अंक रु.५/-**
**वार्षिक वर्गणी रु.३००/-**

नगारा वीकली हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक सौ. सोनाली विनोद गोरवाडकर यांनी जयंत प्रिटींग प्रेस, ८५२, मालेगांव कॅम्प, ४२३१०५ जि.नाशिक (महाराष्ट्र) येथे छापून ८५२, मालेगांव कॅम्प, ४२३१०५, जि. नासिक (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. संपादक - सौ. सोनाली विनोद गोरवाडकर
फोन : (०२५५४) २५२८७३
nagaraweekly@gmail.com
या अंकात प्रसिध्द झालेल्या मजकूराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. वादविवाद मालेगांव न्यायकक्षेत

संपादकीय

**देशातील दारिद्र्य व अज्ञान घालविणे म्हणजे ईश्वराची सेवा होय.**

# पेच शिक्षण माध्यमांचा

नुकतेच पालकत्व प्राप्त झालेल्या माता-पित्यांना अपत्यप्राप्ती बरोबरच आपल्या पाल्याच्या भविष्यातील शैक्षणिक वाटचालीबाबत काळजी वाटू लागते. आजकाल शाळेतील  प्रवेश, तेथे द्यावी लागणारी देणगी, त्यानंतर नियमीतपणे भरावी लागणारी फी या गोष्टींना तर सामोरे जावेच लागते, पण त्याहीपेक्षा शिक्षणासाठी कुठले माध्यम निवडावे हा प्रश्न खूप सतावतो. बहुसंख्य पालक स्वत: मराठी माध्यमातून शिकलेले असतात कारण त्यांच्यावेळेस इंग्रजी माध्यमाच्या शाळांची अनुपलब्धता होती. बहुतांश पालकांचा ओढा मराठी माध्यमाकडे असला तरी छोट्या किंवा मध्यम आकाराच्या गांवात किंवा शहरात मराठी माध्यमाच्या चांगल्या शाळा अभावाने असल्याने नाईलाजाने इंग्रजी माध्यमाकडे वळावे लागते ही वस्तुस्थिती आहे.

मुलांना शिकण्यासाठी कोणतं माध्यम बरोबर, हा प्रश्न घेऊन सल्ला मिळविण्याची पालकांची धडपड सुरु असते. तसं पाहिलं तर माध्यमाची निवड हा खूप वैयक्तीक निर्णय आहे. तसं कुठल्याच माध्यमात चूक किंवा बरोबर असं काही नसतं. वस्तुनिष्ठपणे विचार केला तर माध्यम बरोबर असं विचारण्याऐवजी कुठलं माध्यम सोईचं राहील असा दृष्टीकोन असला पाहिजे. शाळा सुरु करण्याच्या वयात मुलाला जी भाषा सर्वात चांगली समजते, त्याच्या भोवतालच्या वातावरणात असते, तिथूनच शिक्षण सुरु होणं सोयीचं असतं. हे झालं साधं कॉमनसेन्सचं उत्तर. पालकांना ते स्विकारता येत नसेल तर 'काय हवंय म्हणून तुम्ही मातृभाषा सोडून इंग्रजी माध्यमांकडे वळताय?'' या प्रश्नाचं उत्तर शोधणं येतं.

'उद्याच्या कॉम्पिटीशन'ला पुरं पडलं पाहिजे', 'आजकाल इंग्रजी शिवाय काय आहे? चांगली नोकरी, परदेशी जाणं, स्टेटस् वगैरे.......वगैरे, वगैरे, 'आम्ही मराठी माध्यमातून शिकलो तर आमचं सगळीकडे अडतं-मुलाचं तरी नको अडायला...' एका गटातल्या पालकांची ही ठराविक दोन-तीन उत्तरं असतात. सुरुवातीचं शिक्षण मातृभाषेतून असावं, हे अनेकांना तत्त्वत: पटत असतं, पण स्टेटस् आड येत असतं. मराठी माध्यमातलं सध्याचं 'क्राऊड' स्वत:च्या मुलासाठी अगदी अयोग्य वाटत असतं. दुसऱ्या बाजूला 'मराठी मातृभाषा सोडून परकियांच्या भाषेत कशाला शिकायचं, असं अभिनिवेशानं म्हणणारा एक छोटा गट असतो. याशिवाय ग्रामीण आणि निमशहरी पालकांचा एक खूप मोठा गट आहे की, ज्यांना गावात उपलब्ध असेल ते माध्यम स्वीकारण्याशिवाय पर्यायच नाही, पण तरी माध्यमाचा विचार त्यांच्या मनात असतो. ज्यांना माध्यमाचा प्रश्न प्रामाणिकपणे सोडवायचा असेल त्यांनी वस्तुस्थिती आणि शक्यतांच्या कसोटीवर आपल्या मनातले विकल्प घासून पाहायला हवेत.

इंग्रजी माध्यम हवं असण्याचं सर्वात महत्त्वाचं कारण 'मुलांना इंग्रजी उत्तम बोलता यायला हवं' हा मुद्दा बरोबर आहे. जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेत कुठल्याही माध्यमातून शिकणाऱ्या मुलांना इंग्रजी बोलता यावंच. पण चांगली संवादी (कम्युनिकेटीव्ह) इंग्रजी भाषा येण्यासाठी काय केलेलं उपयोगी पडेल? अभ्यासाचे सगळे विषय इंग्रजीतून शिकल्याने इंग्रजी भाषा उत्तम यायला लागेल हे गृहितकसुद्धा तपासून पाहणे गरजेचे आहे.

अती बुद्धीमान आणि आव्हानात्मक अशी दोन टोकाची मुलं सोडली तर मधल्या टप्प्यातल्या बहुसंख्य मुलांच्या आजूबाजूचं वातावरण मराठी असतं. त्यामुळे बाकी काहीच न बदलता अचानक सगळे, नवीन विषय परक्या भाषेतून अंगावर येतात. या लहान मुलाकडे एवढी शब्दसंपदा नसते. पहिल्या दिवसापासून त्याला निम्मं अधिक डोक्यावरुन जात असतं. पण पालकांचा डायरेक्ट मेथडवर विश्वास. त्यामुळे थोड्या दिवसांनी होईल सवय, असं गृहीत धरलं जातं. शाळेत बाकी मजा, मित्र मैत्रिणी असतात, त्यामुळे पहिल्यांदा ते फार टोचत नाही.

आपण इंग्रजी माध्यमातून शिकत आहोत हा अभिमान अगदी लहान मुलांनाही वाटायला लागतो. पालकांच्या (त्यातही आयांच्या) बोलण्यातून प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे तो मुलांना झिरपत असतो. त्यामुळे मुलांना मराठी माध्यमाचा कमीपणा वाटायला लागतो. मराठीचीच लाज वाटायला लागते. मातृभाषेतून शिकल्यामुळे सोपं जाणं म्हणजे काय, याचा अनुभवच नसतो. त्यामुळे नव्या अनेक अनोळखी शब्दांमुळे जड जातंय हे आधी कळत नाही, जेव्हा कळायला लागतं, तेव्हा खूप वेळ होऊन गेलेली असते.

पालकांच्या काय की विद्यार्थ्यांच्या काय मनात एक प्रकारचा गंड तयार व्हायला सुरुवात होते. आपण इंग्रजी माध्यमातून शिकत आहोत हा अहंगड, तर आम्हाला नीट इंग्रजी येत नाही हा न्यूनगंड. 'माध्यम कुठलं घ्यावं' हे या समस्येच्या हिमनगाचं फक्त वरचं एक दशांश दिसणारं टोक आहे. खरी समस्या आहे, ती या मनातल्या गंडाचीच. न्यूनगंड काय किंवा अहंगंड काय, दोन्हीही वाईटच.

# कान्होळी नदी आणि दंतकथा


।। मुक्तक ।।

प्रा.सुरेश भिलकोटकर

मो. : ९४२१६०९४३७

(लेखक मुक्त विद्यापीठात प्राध्यापक आहेत.)




भिलकोट हे साधारण दोन-सव्वादोन हजार लोकवस्तीचे माळमाथ्यावरील गाव. गावात जिल्हा परिषदेमार्फत चालविली जाणारी एक ते सात वर्गापर्यंतची प्राथमिक शाळा. गावात पोस्ट ऑफिस नाही. माध्यमिक शाळा झोडग्याला तर महाविद्यालयीन शिक्षण मालेगावला. आठवडे बाजार, झोडगे हे आसपासच्या अनेक गावांचे केंद्रवर्ती ठिकाण.

भिलकोटला १९७९ साली महामंडळाची बस सुरु झाली होती. पण या बसचा मार्ग मोठा गंमतीशीर... नाशिकच्या माणसाने दिल्लीला जातांना कलकत्ता मार्गे जावे असा. ही बससेवा फार काळ तग धरु शकणार नाही याची व्यवस्था तिच्या सुरु होण्याआधीच महामंडळाने करुन ठेवली असावी.



एका बाबतीच भिलकोट नक्कीच नशीबवान होते. ते म्हणजे गावाच्या दोन्ही बाजूंनी कान्होळी नदीने वेढलेले होते. शिवारातही या नदीने वेडीवाकडी वळणे घेत जणू काही या गाव-शिवाराला युगानयुगे गोंजारायचा आणि आपल्या कुशीत ठेवण्याचा प्रयत्न केला होता. या नदीला सरकारी कागदपत्रात नाला म्हटलेले आढळते. या नदीचे पाद रुंद नसले तरी खोली मात्र चांगलीच होती. गावाच्या पूर्व भागातील नदीपात्रात उभे राहिले तर गाव टेकडीवर वसल्यासारखे वाटते. या नदीच्या पात्रातील निरनिराळ्या ठिकाणांना नावेही मजेशीर, पिंपळघाट, सरगोट्या, कुंझ्या डोह, काळपाट, आसरपाट, आंबानी डाब, भुरक्या डोह, गाडवाट, माध्यानी डाब, गोंदे, मांजरकडका, मोगऱ्या देव, माच्या तुकड्या, जून पाणी अशी ती नावे. या प्रत्येक नावामागे काही ना काही कारणे आणि दंतकथा प्रचलित होत्या. कान्होळी नदीला पूर्वीच्या काळात संक्रातीपर्यंत चांगले वाहते पाणी असायचे. अगदी उन्हाळ्यात मे महिन्यातही अनेक डोहांना भरपूर पाणी असायचे. भुरक्या होड, काळपाट, आसरपाट आणि कुंझ्या डोहात आम्ही मुले उन्हाळ्यातही पोहायचो.

'जूनपाणी' या ठिकाणचे पाणी कितीही वर्ष दुष्काळअसला तरी पूर्णपणे आटत नाही अशी अख्यायिका होती. 'भुरक्या डोहा'च्या कपारीजवळ कोणी गेले तर तो आत ओढला जातो. पूर्वी अमुक अमुक बुडून वारल्यामुळे तो तेथून जाणाऱ्या कोणालाही सोडत नाही, अशा कथा चर्चिल्या जायच्या.

कुंझ्या डोहात पट्टीचा पोहणारा असला तरी त्याला 'ठाव' लागत नसे. म्हणजे डोहाच्या तळातील वाळू, खडी या माती वर आणता येत नसे. या कान्होळीवरील कुंझ्या डोहाबद्दल अनेक दंतकथा त्यावेळी प्रचलीत होत्या. सात खाटांचे सुंभ म्हणजे दोरी एकाला एक जोडून लावली तरी ती तळ गाठू शकणार नाही अशी चर्चा जुनी जाणती मंडळी चर्चा करायची. दुसरी अशी आख्यायिका होती की, या डोहात पूर्वी संपूर्ण लग्नाचे वऱ्हाड, नवरदेव-नवरीसह बुडाले आहे. दर अमावस्या व पौर्णिमेला येथे संबळ-सनई-पिपाणी वाद्यांचा आवाज येत असतो, असेही म्हटले जायचे. यामुळे अमावस्या व पौर्णिमेला या परिसराकडे जायचे धाडस भले-भले करीत नसत. हा डोह नेमका आमच्या शेताच्या रस्त्याला होता. त्यामुळे आम्हा भावंडांना या रस्त्याने जावे लागत असे. संबळ आणि पिपाण्यांचा आवाज आम्हीही अनेकदा ऐकला होता. अनेकदा आमची येथे घाबरगुंडी उडालेली मला आठवते. परंतु थोडे पुढे जाते झाल्यावर या आवाजामागचे गूढ शोधण्याचा आम्ही प्रयत्न केला.

'कुंझ्या डोह' अशा ठिकाणी आहे, जेथे कान्होळी नदी पश्चिमेकडून-पूर्वेकडे वाहत येते आणि डोहाजवळ सपकन काटकोनात उत्तरेकडे वळते. हे वळण घेण्याचे मुख्य कारण म्हणजे नदीच्या पूर्व दिशेला उंच आणि पसरलेला काळा पाषाण, कुंझ्या डोहापासून किमान पन्नास फूट उंच आणि दोनशे मीटर लांब पसरलेला हा खडकांचा पराडा डोहाच्या पूर्वेला दक्षिणोत्तर आजही पसरलेला आहे. हा खडक काळा असल्याने त्याला 'काठपाट' म्हटले जाते. याच दक्षिणोत्तर पराडाच्या पश्चिमेला दोन किलोमीटर अंतरावर साजवहाळ नावाचे गाव आज आहे. या गावातील, शेतातील, नदीपात्रातील किंवा मधल्या खडकाळ रस्त्यांवरील माणसांचा बैलगाड्यांचा, बैलांच्या गेजा-घुंगरांचा आवाज या खडकाळ पराड्यावरून प्रतिध्वनीत रुपांतरीत होत असायचा. तो मी आणि माझ्या सवंगड्यांनी अनेकदा अनुभवला होता. साजवहाळ परिसरात लग्न-समारंभ आणि तत्सम कार्यक्रम असला तर त्यात वाजणारे संबळ, पिपाण्या, सनईचा आवाज या काळपाटच्या खडकावर आदळून त्याचे प्रतिध्वनित रुपातर व्हायचे. हा प्रतिध्वनी परिसरात घुमायचा. याच प्रतिध्वनीच्या आवाजाला बुडालेल्या लग्नाचा आवाज म्हणून लोक समजायचे.

कुंझ्या डोहाच्या पश्चिमेकडील कान्होळीचे पात्र बऱ्यापैकी उथळ आणि संपूर्णपणे खडकाळ. या खडकांवर बैलगाडीची चाके, त्यांच्या धावांचा आकार, मनुष्याची पावले, पातेल्यासारखी भांड्याचे आकार स्पष्टपणे दिसायचे. अतिशय स्वच्छ अशा या खडकांवर उमटलेल्या आकारांमुळे डोहात लग्न बुडाल्याच्या आख्यायिकेला बळकटी मिळायची. पात्रात उमटलेले आकार त्या खडकाच्या निर्मिती काळातील नैसर्गिक घडमोडीमुळे तयार झाले असल्याची शक्यता मोठी असल्याचे जाणवते. त्यानंतर गाव, नागरिक, समाज जसे जसे जाणते होऊ लागले, तसतशा या दंतकथा पुसट व्हायला लागल्या. आमच्या लहानपणी अतिशय गांभिर्याने चर्चिल्या जाणाऱ्या या दंतकथा आताची पिढी गमतीचा भाग म्हणून सोडून देते. हे बरोबर वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित होत असल्याचे लक्षण आहे.